नियमित फौजदारी खटला क्र.६८/२०२१

नि. क्र. ६०

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक –५ मी शपथपूर्वक सांगतो कि –**

**माझे नाव –** किशोर लक्ष्मण गावडे

**वय** – २८ वर्षे **धंदा** – हॉटेल व्यवसाय

**राहणार –** आंबोली, कामतवाडी, ता. सावंतवाडी.

**सरतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती डी. व्ही. गोवेकर यांचेतर्फे –**

१. दि.२८/०२/२०२१ रोजी आम्ही आमच्या स. नं. ८४–ड या जागेमध्ये सकाळी ११.०० वाजता साफसफाई करत होतो. त्यावेळी १२.०० वाजण्याच्या सुमारास आम्हाला आरडा ओरडा केल्याचा आवाज आला. त्यामुळे माझा मोठा भाऊ कृष्णा गावडे व वडील लक्ष्मण गावडे हे दोघे पाखरे यांच्या घरी गेले. ते दोघे बराचवेळ झाला तरी आले नाहीत त्यामुळे मी व माझा लहान भाऊ रोहित गावडे व आई असे मिळून पाखरे यांच्या घरी गेलो. तिथे आरोपी विष्णु याच्या हातात लोखंडी रॉड होता. तो लोखंडी रॉडने बांधकाम पाडत होता. बाजुला पाखरे यांची बोलेरे पिकअप होती त्यावर पाडलेले बांधकाम पडल्यामुळे गाडीचे नुकसान झाले. विशाल चव्हाण याने पाखरे यांच्या बायकोला धक्काबुक्की केली. पाखरे यांची मुलगी मोबाईलमध्ये व्हीडीओ काढत असताना चव्हाण यांच्या मुलाने मोबाईल काढून फेकून दिला. विष्णु चव्हाण आम्हाला देखील शिवीगाळ करु लागला. आरोपीने पाखरे यांची कॉलर धरली. विष्णू चव्हाण यांच्या मुलाने आम्हाला शिवीगाळ करुन अॅट्रोसीटीची केस घालण्याची धमकी दिली. माझा भाऊ कृष्णा गावडे याने दिनांक १५/३/२०२१ रोजी तक्रार दिली. आरोपींनी तोडफोड करण्यासाठी वापरलेला लोखंडी रॉड दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला दाखविण्यात आलेला लोखंडी रॉड आर्टीकल 'अ' हा तोच आहे. आरोपींना दाखविल्यास मी ओळखू शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर नाहीत.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. डी.व्ही. ठाकुर यांचेतर्फे –</u>**

२. स. नं. ८४–ड चे एकूण क्षेत्र दीड एकर इतके आहे. सदर जमिनीच्या आजुबाजुला कोणाच्या जमिनी आहेत हे मी सांगू शकत नाही. घटनास्थळापासून थोडया लांब अंतरावर चार लोकांची घरे आहेत. त्यांची नांवे मला सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, स. नं. ८४–ड च्या सातबारा उताऱ्यावर माझ्या आजोबांचे नांव नाही. भूमी अभिलेख सावंतवाडी यांच्यामार्फत घटनेवेळी किंवा त्यापूर्वी स. नं. ८४–ड चा नकाशा काढण्यात आला नाही याची मला माहिती नाही.

३. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींसोबत आमचे जमिनीवरुन वाद आहेत. हे म्हणणे खरे आहे की, विष्णु चव्हाण याने पाखरे व इतर लोकांविरुध्द स. नं. ८४–ड त्याच्या मालकीची आहे अशी हक्कप्रस्थापना होण्याकरीता दिवाणी दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दोन–तीन वर्षापूर्वीपासून दावा प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयाने अद्याप जमिन कोणाच्या मालकीची आहे हे ठरवले नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामपंचायतीने कृष्णा पाखरे यांना घर बांधण्यासाठी परवानगी दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या गांवात सातबारा नांवावर असेल तर घर बांधण्याची परवानगी दिली जाते अन्यथा दिली जात नाही. हे म्हणणे खरे आहे की, विष्णु चव्हाण यांच्या आईचे वय ७७ वर्षे व वडीलांचे वय ८४ वर्षे इतके आहे. हे म्हणणे खरे आहे की, विष्णु चव्हाण याने आमच्याविरुध्द ॲट्रोसीटीचा गुन्हा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला संपूर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींसोबत जमिनीवरुन वाद असल्यामुळे व ॲट्रोसीटीच्या केसकामी बचावासाठी मी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,
सही/–
(जे.एम.मिस्त्री)
दि. ४/०२/२०२६. न्यायदंडाधिकारी वर्ग–१ सावंतवाडी.

<u>**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक –६ मी शपथपूर्वक सांगतो कि –**</u>

**माझे नाव —** गीता कृष्णा पाखरे

**वय** – ३९ वर्षे **धंदा** – गृहिणी

**राहणार —** आंबोली, जकातवाडी, ता. सावंतवाडी.

<u>**सरतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती डी. व्ही. गोवेकर यांचेतर्फे –**</u>

१. दि.२८/०२/२०२१ रोजी माझे पती आमच्या घरी घराचे काम करत होते. त्यावेळी दुपारी १२.०० वाजण्याच्या दरम्यान आरोपी विष्णु चव्हाण, त्यांची आई आनंदी, वडील धोंडी, मुलगा विशाल व भाऊ शंकर असे मिळून आमच्या घरी आले. त्यांनी लोखंडी रॉडच्या सहाय्याने आमच्या बांधकामाची तोडफोड केली. आरोपींनी लोखंडी रॉडने चिऱ्याचे बांधकाम तोडले, सेंट्रींगच्या फळया देखील तोडल्या. तसेच चिरे आमच्या बोलेरे पिकअप गाडीवर टाकले. आरोपींनी आम्हाला शिवीगाळ केली व माझ्या पतीच्या अंगावर धावून गेले. आमच्या लहान मुली रडू लागल्या. त्यांचा आवाज ऐकून कृष्णा गावडे व त्यांचे भाऊ तेथे आले. आरोपींनी त्यांना देखील शिवीगाळ केली. आरोपी विशाल व विष्णु माझ्या अंगावर देखील मारायला धावून आले होते. कृष्णा गावडे याने सावंतवाडी पोलिस स्टेशनला आरोपींविरुध्द तक्रार दिली. आरोपींनी तोडफोड करण्यासाठी वापरलेला लोखंडी रॉड दाखविल्यास मी ओळखू शकते. आता मला दाखविण्यात आलेला लोखंडी रॉड आर्टीकल 'अ' हा तोच आहे. माझी मुलगी मोबाईलमध्ये व्हीडीओ काढत होती त्यामुळे विष्णु चव्हाण याने तिचा मोबाईल काढून घेवून लांब फेकुन दिला. आरोपींना दाखविल्यास मी ओळखू शकते. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर नाहीत.

सरतपास पूर्ण.

नियमित फौजदारी खटला क्र.६८/२०२१
नि. क्र. ६१ लगत

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. डी. व्ही. ठाकूर यांचेतर्फे –**

२. आंबोली गावात माझ्या पतीच्या नांवाने जमिन नाही याची मला माहिती नाही. आमचे घर कोणत्या सर्व्हे नंबरमध्ये आहे ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, घराच्या बांधकामाकरीता माझ्या पतीने तहसिलदार यांची परवानगी घेतली नव्हती. कोणत्या सर्व्हे नंबरमध्ये बांधकामाची परवानगी दिली होती ते मला सांगता येणार नाही. मला घराच्या बांधकामचे क्षेत्र सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने कृष्णा लक्ष्मण गावडे, माझे पती व इतर लोकांविरुध्द न्यायालयात दिवाणी दावा दाखल केला आहे. दावा कधी दाखल केला हे मला सांगता येणार नाही. बाकी प्रलंबित केसीसबद्दल मला काही माहिती नाही. त्यामुळे जमिन आमची आहे की आरोपीची आहे हे अद्याप ठरलेले नाही याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी आमची बोलेरे गाडी जप्त केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी मुलगी व्हीडीओ काढत असलेला मोबाईल आम्ही पोलिसांना दिला नाही. आरोपींनी पाडलेल्या बांधकामाचे पोलिसांनी मोजमाप घेतले असे काही घडले नाही त्याबाबत मला काही आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीसोबत माझ्या पतीचे जमिनीवरुन वाद आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी आरोपींविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–
(जे.एम.मिस्त्री)
न्यायदंडाधिकारी वर्ग–१ सावंतवाडी.

दि. ०४/०२/२०२६

नियमित फौजदारी खटला क्र.६८/२०२१

नि. क्र. ६२

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक –७ मी शपथपूर्वक सांगतो कि –**

**माझे नाव —** रोहित लक्ष्मण गावडे

**वय** – २१ वर्षे **धंदा** – हॉटेल व्यवसाय

**राहणार —** आंबोली, कामतवाडी, ता. सावंतवाडी.

**सरतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती डी. व्ही. गोवेकर यांचेतर्फे –**

१. दि.२८/०२/२०२१ रोजी मी, माझा भाऊ कृष्णा, किशोर व आई वडील असे मिळून जकातवाडी येथील आमच्या स. नं. ८४–ड या जागेमध्ये सकाळी ११.०० वाजता साफसफाई करत होतो. त्यावेळी अर्ध्या तासाने आम्हाला पाखरे यांच्या घराकडून आरडा ओरडा केल्याचा आवाज आला. त्यामुळे आम्ही काय झाले हे पहाण्यासाठी गेलो असता त्याठिकाणी विष्णु चव्हाण, शंकर चव्हाण, विशाल चव्हाण व त्यांचे आई, वडील हे तिथे होते. विष्णु चव्हाण याच्या हातात लोखंडी रॉड होता. पाखरे यांचे ताजे बांधकाम होते ते विष्णु चव्हाण लोखंडी रॉडने तोडत होता. त्यामुळे पाखरे यांच्या बोलेरो गाडीचे नुकसान झाले. मी विष्णु चव्हाण याच्याकडे विचारणा केली असता त्याने मला शिवीगाळ घालण्यास सुरुवात केली. पाखरे यांनी आरोपींना जाण्यास सांगितले असता त्यांनी पाखरे यांची कॉलर पकडली. विशाल चव्हाण याने पाखरे यांच्या घरात घुसुन त्यांच्या पत्नीवर हात टाकला. पाखरे यांची मुलगी मयुरी व्हीडीओ शुटींग करत असताना विशाल चव्हाण याने तिचा मोबाईल फेकून दिला. माझा भाऊ कृष्णा गावडे याला विशाल चव्हाण याने अॅट्रोसीटीची केस दाखल करणार अशी धमकी दिली. त्यामुळे माझा भाऊ कृष्णा गावडे याने सावंतवाडी पोलिस स्टेशनवर जाऊन आरोपींविरुध्द तक्रार दिली. आरोपींनी तोडफोड करण्यासाठी वापरलेला लोखंडी रॉड दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला दाखविण्यात आलेला लोखंडी रॉड आर्टीकल 'अ' हा तोच आहे. आरोपींना दाखविल्यास मी ओळखू शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर नाहीत.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. डी.व्ही. ठाकुर यांचेतर्फे –**

२. स. नं. ८४–ड चे एकूण क्षेत्र मला सांगता येणार नाही. सदर जमिनीच्या आजुबाजुला कोणाची घरे आहेत हे मला सांगता येणार नाही. भुमी अभिलेख सावंतवाडी

यांच्यामार्फत घटनेवेळी किंवा त्यापूर्वी स. नं. ८४–ड चा नकाशा काढण्यात आला नाही याची मला माहिती नाही.

३. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींसोबत आमचे जमिनीवरुन वाद आहेत. विष्णु चव्हाण याने पाखरे व इतर लोकांविरुध्द स. नं. ८४–ड त्याच्या मालकीची आहे अशी हक्कप्रस्थापना होण्याकरीता दिवाणी दावा दाखल केला आहे याची मला माहिती नाही. घटनेच्या दोन–तीन वर्षापूर्वीपासून दावा प्रलंबित आहे याची मला माहिती नाही.

४. ग्रामपंचायतीने कृष्णा पाखरे यांना घर बांधण्यासाठी परवानगी दिली नव्हती याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या गांवात सातबारा नांवावर असेल तर घर बांधण्याची परवानगी दिली जाते अन्यथा दिली जात नाही. कृष्णा पाखरे याच्या घरापासून माझे घर अर्धा ते एक किमी अंतरावर आहे. कृष्णा पाखरे याच्या घरापासून आरोपीचे घर देखील अर्धा ते एक किमी अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, बोलेरो गाडी पोलिसांनी जप्त केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, विष्णु चव्हाण यांच्या आईचे वय ७७ वर्षे व वडीलांचे वय ८४ वर्षे इतके आहे. हे म्हणणे खरे आहे की, विष्णु चव्हाण याने आमच्याविरुध्द ॲट्रोसीटीचा गुन्हा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला संपूर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींसोबत जमिनीवरुन वाद असल्यामुळे व ॲट्रोसीटीच्या केसकामी बचावासाठी मी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–
(जे.एम.मिस्त्री)
न्यायदंडाधिकारी वर्ग–१ सावंतवाडी.

दि. ४/०२/२०२६.